**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

**वर्ष ८६ वे) प्रभुतरुण मुंबई, रविवार, ता. १६ माहे जानेवारी, सन २०११ (अंक ९७८**

*संपादकीय*

## अनुवादित साहित्याचे मराठी साहित्याला योगदान

**-सुहासिनी कीर्तिकर**

रसिकहो, नवर्षाच्या शुभेच्छा. या अंकात वेगळी सदरे, वेगळे लेखक, वेगळा मानस तुम्हाला आढळेल. तुम्ही याचे स्वागतच कराल, याची खात्री आहे. ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात २५-१२-१० रोजी झालेल्या परिसंवादात माझा सहभाग होता. तेव्हा केलेले भाषण अनेकांनी 'प्रभुतरुणा'त देण्याची आग्रही विनंती केली. नलिनी तळपदेंची विनंती डावलणे अनुचित वाटले. म्हणून माझ्या भाषणाचा सारांशच येथे देत आहे.

मराठी साहित्याला अनुवाद हा साहित्यप्रकार नवखा नाही. त्याला जवळजवळ एका शतकाची परंपरा आहे. ब्रिटीश अमदानीत राज्यस्तरावरील शासकीय धोरणामुळे मराठी साहित्याची जी निर्मिती झाली त्यात सत्तर टक्के भाषांतरीत, अनुवादित साहित्यच होते. वसाहतवादाचा इतका प्रभाव होता की 'अव्वल इंग्रजी कालखंड' म्हणून वाङ्मयेतिहासातील ओळखला जाणारा अवकाश 'भाषांतर युग' म्हणूनच स्वीकारला गेला. याचा अर्थ असा की नवशिक्षीतांवर इंग्रजी आणि संस्कृत भाषेचा प्रभाव पडला. 'अभिज्ञान शाकुंतल' काय; किंवा 'विकार विलसित' हे हॅम्लेटचे आगरकरांनी केलेले भाषांतर काय- या आणि यासारख्या भाषांतरांनी त्यावेळचे मराठी साहित्य समृद्ध होत होते. मराठी साहित्यात अनुवादप्रभाव असा पूर्वीपासून जाणवतो. या अर्थाने टोकाला जाऊन समीक्षकांनी मराठीला परभृत भाषेचा दर्जाही दिला! 'नवनीत'कारांनी संतवाङ्मय नव्याने ओळखीचे करून दिल्यावर हा गैरसमज ठरला; ही गोष्ट वेगळी. 'साहित्याला योगदान' पहाता अशा अनुवादांनी संस्कृत, इंग्रजी अभिजात कलाकृतींची ओळख आणि जाणीव करून दिली हे महत्त्वाचे. त्यामुळे स्फूर्ती घेऊन मराठीत स्वतंत्र निर्मिती झाली हे विशेष. कादंबरी, नाटक, ललित निबंधलेखन, कविता या साहित्यबंधांवर अनुवादित साहित्याच्या वा त्या साहित्याचा आकृतीबंधांचा परिणाम झाला. त्याकाळात गाजलेला 'सुनीत' हा काव्यप्रकार आला, लोकप्रिय झाला. कवितेच्या क्षेत्रात आज लोकप्रिय असलेले गझल, हायकूसारखे प्रकार अनुवादित साहित्यामुळे अधिक बांधीव झाले. जपानी हायकूंचे शांताबाई शेळक्यांनी फार सुंदर भाषांतर केले आहे. शिरीष पैसारख्यांनी या हायकूंना स्वतंत्र मराठी रूप दिले. शाम खरेंसारखे संपादक आज इंदरहून हायकूपत्रिका काढतात. तसेच आज गझल हा मराठीच प्रकार होऊन बसला आहे. रवींद्रनाथांच्या गीतांजलीचे भाषांतर झाले. निरंजन उजगऱ्यांच्या 'हिरोशिमाच्या कविता' आल्या. 'सोवियेत कविता' आल्या

मराठी नाटक भाषांतरामुळे अधिक समृद्ध झाले असे म्हणता येईल. 'राजा इडिपस'-'चंद्र नभीचा ढळला' (कॅल्युगुला')-दारव्हेकर, किंग लिअर-विंदांनी केलेले, 'सुंदर मी होणार'-पु.ल. अशी कितीतरी भाषांतरीत नाटके मराठी मंचाला नवीन आयाम देऊन गेली. ग्रीक, इंग्लीश नाटकांबरोबरच कन्नड, बंगाली, गुजराती, हिंदी रंगभूमीवरील नाटकांचेही अनुवाद मराठी नाट्यसृष्टीला नवीन प्रयोगांची जमीन देऊन गेले. हयवदन, नागमंडल सारखी नावे आता आठवत आहेत. ती फुलराणी, एक झुंज वाऱ्याशी सारख्या अनुवादित नाटकांनीही मराठी नाट्यसृष्टी समृद्ध झाली आहे. लोकनाट्य आणि ग्रीक 'कोरस' यांचं नाते अनुवादामुळेच जुळले.

मराठी कादंबरी ही घटनाप्रधान, व्यक्तीप्रधान अशी घडत गेली ती अनुवादामुळेच. मामा वरेरकरांनी बंकीमचंद्रांच्या कांदबऱ्या मराठीत आणल्या. उमा कुलकर्णीसारख्यांनी कारंथासारखे लेखक मराठीत रुजवले आणि कादंबरीचा 'वंश' फुलत फळत गेला. कितीतरी वर्षे आपली कादंबरीसंकल्पना या कादंबऱ्याभोवतीच रेंगाळत राहिली.

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Looking Beyond!

**- Sanjana Kothare**

On the threshold of the New Year and the end of the past year makes one ponder over the past and look forward to the future. Many resolutions are made, of course to be broken in the near future. Nevertheless, that does not stop us from making new resolutions and making some changes in our regular routine. As the resolutions which are generally made for the betterment of oneself are tough to abide to, similarly the changes are difficult to accept by many. However change is inevitable and moreover a change is necessary for survival. People, who cannot adapt to these changes and the requirements of the present age, face difficulties in adapting to the society at large.

When we talk about 'change' here we mean the change in the society, the change in the lifestyle of people and the change in the thinking of people. When we say people have changed, the generation has changed, and every individual at some point of time realizes that 'the change' is taking place and that either they need to adapt to the change by seeing the world from the perspective of the others or see the world changing from the recluse confinement of their own personal thoughts. Such people are very rigid in their thought process and refuse to adjust and accommodate with the change around them. The entry of anything new in our life be it a new job profile or an added responsibility, gives rise to certain expectations which in turn give us a boost to perform better.

It is truly beneficial for the person who willingly makes a change in himself and it is also beneficial for the society at large to adjust to such a person who is prepared to accept the change in the society by adapting to the change in himself and his thought process. Today if the people belonging to the age old generation feel that the present is not what it used to be, should be 'glad' about the fact that, 'it is not what it used to be'. Man has progressed over the years only because he has been able to accept the change in the society and move towards a better tomorrow. Although this would be a controversial subject when we come to think that have we really progressed towards a better tomorrow or have we degraded ourselves to a still further degradation of oneself? Considering the socio-economic and financial growth and a better lifestyle, yes we have progressed a great deal however man as a human being has yet to evolve. When we say man has evolved over the years it means that his progression is limited only in the materialistic world for materialistic gains. This requires special mention here as spiritually we are far behind. Now essentially this deviates us from the subject however I could not refrain myself from adding this line.

Coming back to the point we were talking about a change in the society and moreover accepting such a change inorder to grow and be at par with the society. With the growing demand and living upto the expectation of superseding our past accomplishments, we have brought about a change in the layout of our Prabhu Tarun monthly issue. Prabhu Tarun has evolved over the years catering to the various genre of readership. There was a time when Prabhu

(पान २ कॉलम ३ वर)

पान १ कॉलम २ वरून

कथा हा प्रकार मराठीत वेगवेगळी रूपे घेत स्थिरावला. बोधकथा, प्रचारकथा, सुरस चमत्कारिक कथा, लघुकथा, नवकथा हे सगळे रूपबंध अनुवादित साहित्यामुळे अधिक भरीव झाले. 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' या अरबीतून फ्रेंचमध्ये, फ्रेंचमधून इंग्रजी आणि तिथून मराठी असा भाषांतराचा प्रवास करून आल्या.

मराठीत रुजलेले आणि वाढलेले सगळे 'वाद' = ('इझम्स') अनुवाद साहित्याने मराठी वाचकांपर्यंत पोहोचवले आहेत. व्हर्जिनिया वूल्फचे a room of my own चे भाषांतर झाले. सीमॉन द बोवार अनुवादातून मराठीत आली. 'स्त्रीवादी साहित्य' हा मराठीत वेगळा प्रान्तच आज लेखन, समीक्षेसाठी तयार झालेला आहे. व्हर्जिनिया वूल्फचा अनुवाद करताना कमल देसाई आपली भूमिका स्पष्ट करतात- 'अनन्यसाधारण गोष्टींचा शोध घेण्यात आणि ओळखीचा रस्ता सोडून नव्या रस्त्याने जाण्यात आनंद वाटतो. जाणीवा विस्तारतात.' हे एक उदाहरण मात्र घेतले. अनुवादामुळे 'नवे रस्ते' खुले होतात.

बायबल, कुराण, नित्शे, मार्क्स यांचीही भाषांतरे झाली आहेत. योगी अरविंदांची भाषणे, विवेकानंदांची भाषणे अनुवादित आहेत. इतिहास, तत्त्वज्ञान, धर्मधारणा यावर अनुवादामुळे वेगळ्या अंगाने विचार मराठीत झाला. 'ज्ञानेश्वरी' तरी काय आहे? गीतेचा भावानुवादच ना? परकीय भाषातील किंवा भारतीय भाषातील लोकसाहित्याचेही अनुवाद मराठीत होतात आणि त्यांचा प्रभाव मराठी साहित्यावर पडतो. चतुराई, दंतकथा, कहाण्या, आख्यायिका यातून मूल्यरक्षण, माणसांची चतुराई, श्रद्धेचे सामर्थ्य, प्रेम आणि सामाजिक बंध आदींचे समांतर असलेले विश्व आपल्याजवळ येते. जर्मनीत ग्रिम बंधुंनी परीकथांचे संकलन केले. हॅन्स ॲण्डरसनच्या परीकथा आपल्याकडे आल्या. 'टॉम सॉयर'च्या खोड्यांनी (याचे गंगाधर गाडगीळांनी भाषांतर केले आहे.) बालसाहित्य सजले. भा. रा. भागवत, दिलीप प्रभावळकर, रत्नाकर मतकरीसारख्या साहित्यिकांचे बालसाहित्य आपल्याकडे रुजले आहे. ते या प्रकारचेच आहे. म्हणजे स्वतंत्र लेखनही अनुवादित साहित्यामुळे उभारी धरते.

अमृता प्रीतमच्या कविता, कादंबऱ्या, आत्मचरित्र, कथासंग्रह मराठीत आले. चरित्र, आत्मचरित्रे मराठीत अनुवादित रुपात येतात तेव्हा वाचकविश्व अधिक संपन्नच होते.

मराठी साहित्याला समृद्ध करण्याची अनुवादित साहित्याची ही धावती रूपरेषा. अनुवाद भाषेच्या तौलनिक अभ्यासासाठी उपयोगी ठरतो. अनुवादामुळे त्या त्या भाषेचे वळण कळते. संस्कृतीची ओळख होते. आज जागतिकीकरणामुळे आपण जवळ आलो आहोत हे खरेच. मात्र त्यातूनच एकसूरीपणा, सपाटीकरण आपल्या जीवनशैलीत आले आहे. न्यूयॉर्क, लंडन, मुंबई, शांघाय-; शहर कुठलेही असो. या शहरात एकाच पद्धतीचे पेहराव, एकाच पद्धतीच्या इमारती, एकाच पद्धतीची करमणूक, एकाच पद्धतीचे अन्न असा एकसूरीपणा आला आहे. अशावेळी या एकसूरीपणाला शह देण्यासाठी आपले वेगळेपण दाखविणाऱ्या सर्व खुणा माणूस जपतो. परिस्थिती अशी आहे की जागतिक आणि स्थानिक एकमेकांच्या विरोधात ठाकतात; असे चित्र तयार होते. अशावेळी अनुवाद त्यांच्यामधील ताण दूर करण्याचे उत्तम साधन आहे. उंबरटे इको या लेखकाचे 'माऊस ऑर द रॅट' नावाचे पुस्तक आहे. (मूषक की उंदीर?-म्हणजे 'नेकेड सी'चे भाषांतर नागडा समुद्र करायचे की उघडावागडा समुद्र की बोडका समुद्र?) त्यात Translation as negotiation चा म्हणजेच परस्परसंवादाचा विचार मांडला आहे. अनुवादामुळे दोन संस्कृतींचा, समाजाकृतीचा, साहित्याचा परस्परसंवाद होतो. विचारांची, पद्धतींची, शैलीची देवाणघेवाण (आदानप्रदान) होते. मराठी साहित्याला अनुवादाने दिलेले हे मोठे योगदान आहे. यातून आपली संस्कृती वैश्विकतेकडेही वळलेली दिसते.

रूपवादी समीक्षकांच्या दृष्टीने भाषांतरीत साहित्य ही भिन्न, स्वतंत्र कलाकृती असते. या अर्थाने मराठीत भाषांतरीत साहित्य हे स्वतंत्र साहित्यकृती म्हणूनच आले. युजीन नायडा या भाषावैज्ञानिकाच्या मते भाषांतरीत साहित्यात गतिमान समरूपता असते. यामुळे मराठी साहित्य अधिक भरीव झाले आहे. उदा- पेरिंदलोचे Six caracters in search of an auther'चे माधव वाटवेंनी 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' केले तेव्हा आपली शब्द जाण आणि संस्कृती तेथे व्यक्त झाली. म्हणूनच एकाच साहित्यकृतीची अनेक भाषांतरे एकाच भाषेत होत राहतात. ती नुसती संख्यात्मक भर नसते. मेघदूताचे कुसुमाग्रज, वसंत बापट, बा. भ. बोरकर, वसंत पटवर्धन आदींनी भाषांतर केले. त्यात 'रुचीपालट' असतो; पण मुख्य म्हणजे स्वतंत्र कलाकृती म्हणून देणगी असते. माणसातील माणूसपण शोधणे यामुळे घडते. अशावेळी अनुवाद हा अनुसर्जन (Transcreation) असतो. मराठी साहित्याला हे योगदान फार महत्त्वाचे आहे. आपल्याकडे जागतिक सर्व भाषांतील कविता भगवान ठग यांनी भरपूर आणि एका भूमिकेतून आणल्या. अनघा भट, विद्यासागर महाजन, चंद्रकांत पाटील, माणिक कोतवाल, वि. स. वाळींबे, धनश्री हळबे, शांता शेळके, राम कोलारकर, राम पटवर्धन, अविनाश बिनीवाले, उमाकांत ठोबरे, अशोक जैन, माणिक कोतवाल, अरुणा अंतरकर, माधुरी शानभाग, हेमंत दिवटे, उमा कुलकर्णी, चंद्रकांत भेंजाळ, डॉ. नरेंद्र जाधव, मंगेश पाडगावकर, वसंत देव, वसंत बापट, वीणा आलासे, के. ज. पुरोहित, जी. ए. कुलकर्णी, उषा तांबे, अनुपमा उजगरे, रेखा सबनीस, विजया देव, चेतन ठकार अशी भाषांतरकारांची मोठी मांदियाळीच मराठीत आहे. अनुसर्जन असल्याने एकाच पुस्तकाचे अनेक अनुवाद होतात. 'भयमुक्त चित्त जेथ' हा गीतांजलीचा अनुवाद जसा डॉ. नरेंद्र जाधवांनी केला आहे, तसा पाडगावकरांनीही केला आहे. शशी देशपांड्यांच्या कथांचा अनुवाद उषा तांबेंनी केला आहे तसा सरोज देशपांड्यांनी केला आहे.

लोकवाङ्मयवृत्त 'शेजार' हे सदर चालवून संस्कृतीओळख करून देते. 'आयुध' नियतकालिक भारतीय भाषेच्या अनुवादावर विशेषांक काढते. 'केल्याने भाषांतर' हे नियतकालिक, 'साहित्यसूची'चा एखादा अंक, भाषांतरीत साहित्य देतात. वाचकाला वेगळे विश्व बहाल करतात. आंतरभारतीची कल्पना, राष्ट्रीय आणि वैश्विक एकात्मता त्यातून अधिक घट्ट होते. ललित साहित्यकृतीत येणारे कलाद्रव्य भाषा हे असते. म्हणूनच नॅशनल बुक ट्रस्ट, साहित्य अकादमी, संस्कृती मंडळ भाषांतरीत पुस्तकांचे प्रकाशन करते.

या कलाद्रव्याबरोबरच ज्ञान आणि माहितीविस्फोटाच्या या काळात अनुवादित साहित्य फार मोठी भूमिका बजावून वाचकांना ज्ञानद्रव्यही देते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील वृत्त आधी पाश्चात्य देशातील वृत्तपत्रात येते. उदा- युएसए चायना यांचा करार, ओबामा, विज्ञानशोध वगैरे. AFP (असोसिएटेड फॉरेन प्रेस) रॉयटर्स (International news agencies reuters) 'ब्लूमबर्ग' मधील माहिती, वृत्ते अनुवादित होतात. PTI (प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया) वृत्त देते. अर्थात वर्तमानपत्रात भाषांतरे पहिल्यापासून होत आहेत. मात्र पूर्वी राजकारण सोडून इतर विषयांची म्हणजे साहित्य, तंत्रज्ञान, विज्ञान, कला यांची दखल घेतली जात नव्हती. १९६० पासून सुरुवात झाली. १९९० नंतर भर आला. या अनुवादामुळे विज्ञान घराघरात पोहोचले. वैद्यकीय शास्त्र, अवकाश शास्त्र, पर्यावरण अशा अनेक शाखांनी हे अनुवाद संपन्न झाले. आजही लोकमानसाची ती नितांत गरज आहे. अशी माहिती देणारी पुस्तके आज प्रचंड खपतात. कथा-कादंबऱ्यांना खप नाही इतकी पुस्तकांना मागणी आहे. 'नवे शोध-नव्या वाटा', 'एडसचा भोवरा' (शिधये + डॉ. आनंद जोशी लिखीत) या पुस्तकाच्या दहा हजारांच्या आवृत्त्या खपतात. इंटरनेट, गुगलवर उपलब्ध असणाऱ्या बातम्यांच्या आधारे ही पुस्तके मराठी साहित्याला उपयोजित दालन देऊन जातात. `king of bollywood: शाहरूखखान!' सारखी पुस्तकेही इंग्रजी, मराठी अशी एकाच दमात निघतात किंवा वरळी-वांद्रे सीलिंकवर 'सेतू बांधिला सागरी' आणि `sealink story' एकाच वेळी प्रकाशित होते.

एकंदरीत भाषांतरीत साहित्याचे मराठी साहित्यात योगदान असे प्रभावी आणि गतीमान आहे. जर्मन ज्यू कवयित्री रोझ आऊस ल्येंडर म्हणते- 'माझा विश्वास आहे चमत्कारांवर शब्दांच्या. शब्द विश्वे घडवतात. आणि नवी विश्वे उभी करतात-' चाच शब्दांचा आधार घेऊन अनुवादशक्तीबद्दल हेच म्हणता येईल की अनुवाद साहित्यामुळे मराठी साहित्यात नवी विश्वे उभी राहतात.

●

पान १ कॉलम २ वरून

Tarun had 90% Marathi reading people as their regular readers. Times have changed, so have hands. Today, keeping in mind the sanctity of this news letter which is still considered the most reputed newsletter, we have once again tried to bring about a change in the formatting of the newsletter for this year. We have received rave reviews on our evolution process as we progressed to a bi-lingual news-letter that has been accepted by many however rejected by quite a few. However keeping at par with the current trends and the changes in the society we have seen to it that we too progress and adapt ourselves to the society at large.

From this month onwards for the entire 2011, we have introduced a new section on Career Guidance which shall be featured in our Yuva Manch page. This section shall introduce our young readers especially children who are on the threshold of choosing their careers and their parents who will also be exposed to the various careers options available to their children besides the regular careers of Doctors, Lawyers, and Architects etc. We are trying to cover such careers which are not one of the typically followed career paths which were followed especially in Maharashtrian households as we used to see careers only in three perspectives - Science for engineering/medicine if not that then commerce to become a CA/CS/LLB or then arts if u have nothing else in mind. However nowadays as we too have accepted the change and have evolved over the years we too have learnt to familiarize ourself to the change in the society majorly by taking risks and exploring varied fields. We are consciously keeping the regular career options out of this section as all of us are aware of the requirements for the same. We are trying to focus on careers which are gaining popularity and have now gained an equal standing and recognition in the society.

This introduction to allied careers shall also break the myths involved when youngsters choose their career. Most of them find certain careers to be glamorous and expect their work to be fun-filled however later on they realize that the career they have chosen is not a party –time but involves a lot of hard work for which they are not prepared. We have requested some professionals to talk to us about their careers and introduce us to their field of specialization. These professionals shall talk about how does one start off on this route if anyone is interested in following up their career. They explain to us the qualifications required for their job profile or are there any specialized/professional courses involved which cater to this field. They would also give an update on their respective industry and the growth of their industry. Most importantly they would give an insight to the pros and cons of their field so as to provide the actual picture before the youngsters and their parents before they consider taking up the particular career.

This year we have also introduced the recipe section wherein our talented Pathare Prabhu ladies have contributed their recipes to add some colour to the issue. We hope that our readers accept this change in the issue on a positive note. We would also like to take this opportunity in appealing to our readers to contribute towards the Career Guidance section in terms of an article providing all the necessary information about their respective careers providing valuable information to our young readers and bring about a change in their lives through your valuable contribution. We hope that this change is also welcomed by one and all as we at Prabhu Tarun forever take pride in Looking Beyond.

●




# ‘हस दे तू!’

*(जानेवारी २०११ पासून हे ‘हस दे तू!’ नवीन सदर सुरू करीत आहोत. चित्रपटांमध्ये येणारे विनोदी प्रसंग आणि त्याची करमणूक करणारी उजळणी असा या लेखांचा बाज आहे. ‘प्रभात’चा ‘राणीसाहेबा उर्फ बजरबट्टू’ हा संपूर्ण विनोदी मूकपट निघाला. मात्र अनेक चित्रपटांमध्ये कथानकाला पूरक वा निव्वळ करमणूक-विसावा म्हणून हास्यकारक घटनांची पेरणी पूर्वीपासून होती. आपल्याकडे यातून अनेक ‘कॉमेडीयन्स’ तयार झाले. मुक्रीचा माठपणा, भगवानचा भोळसटपणा, लेट करंट आगा, कावेबाज तिरकसपणा असलेला राधाकिशन, सुंदर, मारुती, मिठ्ठू मियाँ, मोहन चोटी, कादर खान, शक्ती कपूर, जॉनी लिव्हर असे एक ना अनेक ‘हास्यस्फोटक’ आपल्याकडे यातून आले. उत्पल दत्त, देवेन शर्मा, फारुख शेख, धर्मेंद्र, संजीवकुमार आदींनीही यात ‘चार चाँद’ लावले. दामूअण्णांचा तिरका डोळा हसण्यावर तीर मारून गेला. दिनकर कामण्णा, ‘नावात एकही वेलांटी नसलेला’ शरद तळवलकर, दादा कोंडके, राजा गोसावी, निळू फुले, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, असरानी, राजेंद्रनाथ, नसरूद्दीन शाह-किती किती नावे घ्यावीत? या सगळ्यांनी चलत्‌चित्रांत हास्यरंग भरले. त्यापैकी काही रंग श्री. नंदकुमार विजयकरांच्या लेखणीतून या सदरात भरले जाणार आहेत. रसिकहो, हे सदर वाचा, जऽऽरा हसा!-* ***संपादक)***

*‘गोरी जरा हस दे तू, हस दे तू,*
*हस दे जरा,*
*गोरी जरा हस ते तू, हस दे तू,*
*हस दे जरा’*

‘असली नकली’ या चित्रपटातील हे गीत. चॉकलेट हिरो देवानंद एक बस ड्रायव्हर आहे. लहान मुलींना घेऊन तो शाळेला निघालेला असतो. वाटेत एक मुलगी शाळेत जायला तयार नसते. या रुसलेल्या मुलीला हसवून शाळेत जायला राजी करण्याच्या कामगिरीवर देवानंद असतो. आणि मग ‘गोरी जरा हस दे तू’ म्हणून तिची मनधरणी करत असतो. असंच एक गीत. मामा भाचीचं. अशोक सराफ ‘कळत नकळत’मध्ये छकुलीला समजावत असतो.

नाकावरच्या रागाला औषध काय?
गालावरच्या फुग्याचं म्हणणं तरी काय?

हे गीत स्वत: अशोक सराफने गायलं आहे. सुधीर फडक्यांच्या आवाजातील हे गीत तर सुप्रसिद्धच आहे.

*अ आ आई, म म मका*
*मी तुझा मामा दे मला मुका*

हे गीत शरद तळवलकर आणि डेझी इराणी यांच्यावर चित्रित केले गेले आहे. रुसलेल्याला समजावणं, रडणाऱ्याला हसवणं हा आजच्या लेखाचा विषय असावा असं जर तुमच्या मनात आलं असेल तर ते अगदीच चुकीचं आहे असं म्हणता येणार नाही. फरक एवढाच की, उगाचच बळे बळे ‘मोले घातले हसाया’ असं न होता आपल्याला खळाळून हसायचं आहे. चित्रपट संगीतातील हसवणुकीचा मागोवा घ्यायचा आहे. ‘हस दे जरा’ कशाला; हसना है तो पेट फाडके हसो.

कलेच्या प्रांतात हास्य निर्मिती ही सर्वात अवघड गोष्ट समजली जाते. विनोदी गीताची निर्मिती ही तर त्यातून कठीण बाब. मौजमस्तीची गाणी, अनोखी गीतरचना, जगावेगळा कथाप्रसंग आणि या सर्वांना अनुसरून केलेली संगीत योजना. या सर्वांच्या सहयोगाने, आपल्या या चित्रपटसृष्टीने अनेक उत्तमोत्तम हास्यगीतं दिली आहेत. विनोदी गीतासाठी आणखी काही महत्त्वाच्या गोष्टींची आवश्यकता असते. एक म्हणजे साजेसा अभिनय, उत्तम चित्रीकरण आणि सफाईदार संकलन.

मित्रहो, आजपासून अशी काही हास्यगीतं, जी मला आवडली आहेत, भावली आहेत, विशेष म्हणजे वर दिलेल्या निकषांवर खरी उतरली आहेत अशांचा मी आढावा घेणार आहे. त्या काळातील आठवणी जागवणार आहे. आज-काल अशी निखळ हास्य-निर्मिती करणारी गीतं फार अभावानेच चित्रपटात पाहायला मिळतात.

दिल तेरा दिवाना-सुरुवातीचं दृश्य आहे. पडद्यावर ‘रिबेल क्लब. बॉम्बे’ अशी मोठी पाटी दिसते. त्यानंतर पडदाभर एका कुत्र्याचं पोस्टर. अचानक कुत्र्याच्या डोक्याकडला भाग फाडून शम्मीकपूर डोकावतो

भो.... भोभो, भो.... भोभो

मेट्रोगोल्डवीनचा सिंव्ह दोनदा गुरकावून मान खाली टाकतो. इकडे शम्मीकपूर चारदा भुंकून नाचायला लागतो.

*धडकने लगता है मेरा दिल तेरे नामसे*
*ऐसा लगता है की हम गये कामसे*
*ध. ध. ध. ध. धडकने लगता है*

शम्मीकपूर एका मुलीसमोर नाचतोय. ही मुलगी पाठमोरी असते. पंजाबी ड्रेस, डोक्यावरून घेतलेला झिरझिरीत दुपट्टा. बराच वेळ ही युवती कोण काहीच कळत नाही. हळूहळू कॅमेरा फिरतो आणि त्या युवतीच्या चेहऱ्याचा क्लोजअप पडद्यावर दिसतो. प्रेक्षागृहात हास्याचा एकच स्फोट होतो. बाईच्या वेषात मेहमूद. उत्तम मेकअप, भुवया कोरलेल्या, ओठावर लिप्स्टीक, कानात मोठाले इअररिंग्ज आणि मेहमूदच्या चेहऱ्यावरील नखरेलपणा. लोकांचा टाळ्यांचा कडकडाट.

*मेरे दिलमे जब से छूटा तेरे नैन का तीर*
*दिल मे रहकर न गया वो तेरी ही तस्वीर*
*नींद नही आती मुझे आरामसे*
*ऐसा लगता है अब हम गये काम से*

‘तेरे नैन का तीर’ मेहमूदचे डोळे, भुवया उडवणं, नाक मुरडणं गालातल्या गालात हसणं प्रचंड दाद घेऊन जाते. या चित्रपटाचा नायक शम्मीकपूर असला, तरी मेहमूद चांगलाच भाव खाऊन गेला.

गायक-महमद रफी
संगीत-शंकर जयकिशन
गीतकार-हसरतजयपुरी
कलाकार-शम्मीकपूर, मेहमूद, मालासिन्हा, शुभाखोटे, उल्हास
दिल तेरा दिवाना-१९६२

-नंदकुमार विजयकर
nandusuhas03@gmail.com

## The Educational Merit Award Prize Function Organized by Pathare Prabhu Charities

**-Ranjan Khanderao Dhairyawan**

12th Dec. 2010 was noted in my mind. We did arrive from Pune to Mumbai a day before. I had made it a point to reach G.A. Kulkarni Hall (B.P.M. High School) in Khar, well before time, it being the venue of the Prize distribution of Merit Listed Students by Pathare Prabhu Charities. I and my wife Joytsna entered the aduitorium, we were very much impressed by the arrangements made. The stage was very well decorated with sitting arrangements for Chief Guests Mr. Madhav B. Kurdekar & Mrs. Poonam M. Kurdekar and Mr. Ajit M. Vijayakar (Chairman) along with forty Merit Prize awardees. out of forty four awardees, four could not personally attend the function. The souvenir is very attractive and informative, paying homage to renowned ancestors is very good.

The function started with the Chief Guest entering the auditorium at the sound of `Tutari' along with the Chairman & Trustees of P. P. Charities, followed by forty award winners. They lead to the stage. Three artists Mrs. Asavari Dhurundhar, Mrs. Ronika Vijayakar and Mr. Anand Vijayakar; who sang all the songs; were professional. Mr. Anand Naishad Vijayakar did sing very well, though it was his first performance in our communtiy functions.

It is very creditable that every year the number of prize winners is increasing. The young generation has been very sincere about their studies and achievements in this present competitive world. They specalize in various educational fields, even after having various hobbies. I found them to be bold, without stage firght. speech by the Chief Guest Mr. Madhav' B. Kurdekar must have increased the confidence in award winners and also the upcoming students. Mr. Ajit M. Vijayakar (chariman) made an introductroy speech. It was good that each winner was given 2 minutes to tell his success story and thank those who assisted them. They also thanked P.P. Charities for the awards and enhancing their confidance to reach higher goals. Mr. Veerpal R. Rane (Trustee) buffet in his speech, the achievements and the goals of P.P. charities. The P.P. Charities thanked the donors.

The singers sang `Veer Geet' which was invigourating and unique. After the National Anthem the function ended and all the attendees went for a nice buffel dinner & kulfi.

Hats off to chairman, trustees and members of the P.P. charities efforts, planning and toil they have done. Every year the function improves.

(वरील प्रतिक्रिया देत असल्याने पा. प्र. चॅरिटीजच्या देखण्या विद्याभूषण गौरव सोहळ्याविषयी वेगळा वृत्तान्त देण्याची गरज नाही. शिस्तबद्ध, आखीव संयोजित आणि कानांना, डोळ्यांना, मनांना सुखावणारा हा आश्वासक सोहळा चिरंजीव होवो! सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी यांचे अभिनंदन!- **संपादक)**

## प्रभुसेमिनरी

प्रभु सेमिनरीचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार दि. ११ डिसेंबर, २०१० रोजी अत्यंत उत्साहात पार पडले. प्रमुख पाहुण्या प्रभु सेमिनरीच्या उपाध्यक्षा श्रीमती उषा कोठारे होत्या. मुख्याध्यापक श्री. मुकल यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर विश्वस्त कुंदन आगासकर, अध्यक्ष सुभाषराव, सभासद सुबोध प्रधान, श्रीमती उषा कोठारे यांची गौरवपर भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन सौ. सुधा चुरी यांनी केले.

सी व डी विभागातर्फे विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रभु सेमिनरी हायस्कूलने बहु उर्जा प्रकल्प सादर केला होता व त्या प्रकल्पास प्रभु सेमिनरी हायस्कूलने प्रथम क्रमांक पटकाविला.

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



YUVA MANCH

Together Towards Tomorrow

# BE COMING A MARKET RESEARCHER

- Vishal Kothare

Ever wondered how new products are developed? Or why customers choose one brand over another? Or what makes employees of an organisation happy or what turns them off?

The answer normally involves market research. In India, estimates suggest that the industry is worth close to Rs. 1,000 crore a year. In the developed nations, market research is a booming industry and informs nearly all levels of economic, social and political decision-making; and, in the UK it is worth over £1 billion a year.

A career in market research is fast-moving, intellectually-challenging and diverse, allowing you to get involved in the key decision-making processes of a wide variety of companies and industries, from global corporations to local authorities, from your first day at work.

### Starting out

Market research is an MBA-led industry. As such, the majority of applicants for research executive positions will be expected to hold an MBA in marketing after graduation (however, the particular graduation subject is of less importance).

The majority of market researchers are drawn from degree disciplines that require strong communication or analytical skills, such as languages, English literature, maths, economics, psychology, engineering, commerce, geography, history, politics, science and IT. However, even those with degrees as contrasting as zoology, environmental sciences and dramatics are also welcomed by the industry.

### Key qualities

In addition to education, there are a number of qualities which are essential if you want to become a successful market researcher. They are:

- Strong interpersonal skills – MR is a people-focused industry and it is essential for one to be able to communicate well with others
- Commercial awareness
- Interest in people and their behaviour
- Analytical ability
- Numeracy
- Good organisational skills and the ability to meet deadlines
- Problem solving skills
- Ability to work as part of a team

If you fulfil these criteria, then you have to decide the type of environment in which you would like to work – Agency vs. Client-side

### Agency vs. Client-side

Most researchers begin their careers in an agency; a few might commence directly within a client organisation. Which one you opt for depends largely on the type of working environment you think you would most enjoy and what you are looking for from your career.

<u>Agency</u>:

